# वृत्तपत्र सुचना

महादेव पालव मार्ग, भारतमाता जंक्शन ते शिंगटे मास्तर चौकापर्यंत करण्यात येणाऱ्या मोनोरेल बांधकामादरम्यान वाहन चालक व पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून नमुद ठिकाणावरील मोनोरेलचे बांधकाम पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे वाहतुकीवर २४ तास निर्बंध घालण्यात येत आहेत.

१) महादेव पालव मार्ग, भारतमाता जंक्शन ते शिंगटे मास्तर चौकापर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास प्रवेश बंद (No Entry) राहील.

२) महादेव पालव मार्ग, शिंगटे मास्तर चौक ते भारतमाता जंक्शनपर्यंत सर्व प्रकारच्या वाहतुकीकरीता २४ तास एकदिशा मार्ग (One Way) राहील.

३) महादेव पालव मार्ग, भारतमाता जंक्शन ते शिंगटे मास्तर चौकापर्यंत सर्व प्रकारची वाहतुक ही डॉ.बी.ए.रोड, भारतमाता जंक्शन येथून सरळ पुढे डॉ.बी.ए.रोड, साने गुरूजी मार्ग जंक्शन (गॅस कंपनी जंक्शन)—उजवे वळण— साने गुरूजी मार्ग—चिंचपोकळी रेल्वे उड्डाणपुल—कॉ.गणाचार्य चौक—उजवे वळण—ना.म.जोशी मार्ग—शिंगटे मास्तर चौक या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

वाहन चालकांच्या मार्गदर्शनासाठी वाहतुक पोलीसांकडून वर नमुद ठिकाणी मार्गदर्शक फलक लावण्यात येतील. तसेच जनतेला मदत करण्यासाठी वाहतुक पोलीसांची नेमणूक करण्यात येणार आहे. जेणेकरून वाहन चालकांना कमीत कमी गैरसोय होईल व रहदारी सुरळीत चालू राहील.

**सही/—**

**( नंदकुमार चौगुले )**
पोलीस उप आयुक्त (दक्षिण),
वाहतुक, मुंबई.

जा.क्र. ९१७/अे/पोउआ/दक्षिण/वा/११
१८/०४/२०११